भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

आरबीआय/२०११-१२/२७
डीएनबीएस(पीडी).सीसी.क्र. २३३/०३.१०.००१/२०११-१२

जुलै १, २०११

सर्व अबँकीय वित्तीय कंपन्या(एनबीएफसी)

महोदय,

**महापरिपत्रक - जोडलेल्या कार्यकृती - विमा उद्योगात प्रवेश - क्रेडिट कार्ड देणे आणि काही उत्पादांचे विपणन व वितरण**

सर्व विद्यमान सूचना एकाच ठिकाणी मिळाव्यात ह्यासाठी रिझर्व बँकेने ह्या विषयावरील जून ३०, २०११ अखेर पर्यंत दिल्या गेलेल्या सूचना एकत्रित केल्या आहेत. येथे नोंद घेण्यात यावी की, ह्या विषयाशी संबंधित असलेल्या व जोडपत्रात दिलेल्या अधिसूचनांमधील सर्व सूचना ह्या महापरिपत्रकात अद्यावत व एकत्रित करण्यात आल्या आहेत. हे महापरिपत्रक रिझर्व बँकेच्या वेबसाईटवरही (http://www.rbi.org.in) टाकण्यात आले आहे.

आपली

(उमा सुब्रम्हण्यम)

प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक

**विमा उद्योगात प्रवेश**

एप्रिल २७,२००० रोजी गव्हर्नरांनी घोषित केलेल्या नाणेविषयक व कर्जविषयक धोरणाच्या निवेदनात, इतर बाबींबरोबर सांगण्यात आले होते की, एनबीएफसींद्वारा विमा उद्योगात प्रवेश करण्याबाबत मार्गदर्शक तत्वे घोषित करण्यात येतील. त्यानुसार, बाजारात सहभागी होणारांचे दृष्टिकोन/मते/सूचना/टीपा विचारात घेऊन, ह्या बँकेने, जून ९, २००० रोजी, पुढीलप्रमाणे मार्गदर्शक तत्वे दिली आहेत. एनबीएफसींना सांगण्यात येते की त्यांनी त्यांच्या वैधानिक ऑडिटर्सद्वारा प्रमाणित केलेले आवश्यक ते कागदपत्र जोडून, ती एनबीएफसी ज्याच्या अधिकारक्षेत्राखाली येते त्या रिझर्व बँकेच्या अबँकीय पर्यवेक्षण विभागाच्या प्रादेशिक कार्यालयाकडे अर्ज करावेत.

अ) भारतीय रिझर्व बँकेकडे पंजीकृत असलेली इच्छुक एनबीएफसी, जोखीमरहित भाग घेण्यास शुल्क-आधारित असा विमा एजन्सी उद्योगात, रिझर्व बँकेच्या मंजुरीशिवाय काही अटींवर भाग घेऊ शकते.

ब) पात्रता निकष पूर्ण करणाऱ्या व आरबीआयकडे पंजीकृत असलेल्या एनबीएफसीला, सुरक्षा ठेवण्याच्या अटीवर, जोखमीसह विमा उद्योगात भाग घेण्यास परवानगी आहे. एखाद्या संयुक्त उद्योगात, अशा एनबीएफसीद्वारे धारण करावयाची कमाल इक्विटी त्या विमा कंपनीच्या भरणा भांडवलाच्या ५० टक्के असेल. [१] येथे स्पष्ट करण्यात आले होते की, त्या एनबीएफसीच्या गटातील एकापेक्षा अधिक कंपन्या (मग त्या वित्तीय कार्यकृती करत असोत अगर नसोत) त्या विमा कंपनीमध्ये गुंतवणुक करीत असल्यास, त्या जेव्ही असलेल्या विमा कंपनीमध्ये एनबीएफसीसाठी विहित केलेली ५० % टक्क्यांची मर्यादा, त्याच गटातील सर्व कंपन्यांचे एकूण निधीदानाला लागु पडेल.

निवड करण्याच्या धर्तीवर, रिझर्व बँक, सुरुवातीला, एखाद्या प्रायोजक एनबीएफसीला, विहित केलेल्या कालावधीत इक्विटीचा ताबा हस्तांतरित करण्याच्या अटीवर अधिकतर इक्विटी ठेवण्यास परवानगी देऊ शकते.

क) आरबीआयकडे पंजीकृत असलेल्या व वरीलप्रमाणे संयुक्त उद्योगात भाग घेण्यास पात्र नसलेल्या एनबीएफसी, त्या एनबीएफसी निजनिधीच्या १० टक्के पर्यंत किंवा रु ५० कोटी (ह्यापैकी कमी असेल ते) एवढी रक्कम, अशा गुंतवणुकीसाठी असलेले निकष पूर्ण केल्यास, विमा कंपनीत गुंतवू शकतात.

२.एनबीएफसीच्या एखाद्या विभागामार्फत असा उद्योग करण्यासाठी परवानगी दिली जाणार नाही. एखाद्या एनबीएफसीची दुय्यम संस्था किंवा एनबीएफसीच्या किंवा अबँकीय वित्तीय संस्थेचा किंवा बँकिंगचा व्यवसाय करणाऱ्या दुसऱ्या एखाद्या एनबीएफसीच्या गटातील कंपनीला सर्वसाधारणतः जोखमी घेण्यासह अन्य विमा कंपनीशी जोडणी करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

विमा व्यवसायात निवेशक किंवा जोखमी घेण्यासह प्रवेश करणाऱ्या व आरबीआयकडे पंजीकृत झालेल्या सर्व एनबीएफसींना त्यासाठी रिझर्व बँकेची पूर्वमंजुरी घेणे आवश्यक आहे. संबंधित अशा सर्व घटकांचा प्रत्येक प्रकरणात विचार करुन, रिझर्व बँक एनबीएफसीला परवानगी देईल. विमा व्यवसायातील जोखमी त्या एनबीएफसीवर येणार नाहीत ह्याची आणि विमा व्यवसायामुळे येणाऱ्या जोखमीमुळे एनबीएफसीच्या व्यवसाय दूषित होणार नाही ह्याची खात्री केली जावी.

[१] डीएनबीएस.पीडी.सीसी क्र. २२१/०३.०२.००२/२०१० - ११ दि. मे २७, २०११ अन्वये स्थापित.

[2] "त्याच गटातील कंपन्या", ह्या संज्ञेचा, अर्थ म्हणजे, पुढीलपैकी कोणत्याही संबंधामुळे एकमेकीशी संबंधित असलेल्या, दोन किंवा अधिक संस्थांची व्यवस्था :-
दुय्यम-मूळ संस्था (एएस २१ अनुसार व्याख्या केलेली), संयुक्त उद्योग (एएस २७ अनुसार व्याख्या केलेली) सहाय्यक (एएस २३ अनुसार व्याख्या केलेली),प्रायोजक-प्रायोजित (सेबी (ॲक्विझिशन ऑफ शेअर्स ॲंड टेकओव्हर) विनियम १९९७ मध्ये दिल्यानुसार), नोंदणीकृत कंपन्यासाठी, संबंधित पक्ष (एएस १८ अनुसार व्याख्या केलेली), समान ब्रॅंड नेम व इक्विटी शेअर्समध्ये २०% व त्यावरील गुंतवणुक"

[अधिक माहिती, डीएनबीएस.(पीडी).सीसी.क्र १३/०२.०१/९९-२००० दि जून ३०, २००० आणि डीएनबीएस (पीडी) सीसी क्र ३५/१०.२४/२००३-०४ दि फेब्रुवारी १०, २००४ सह वाचित डीएनबीएस (पीडी)सीसी क्र. १८/०२.०१/२००१-०२ दि जानेवारी १, २००२ मध्ये.]

**क्रेडिट कार्ड देणे**

३) रिझर्व बॅंकेची पूर्व मंजुरी घेतल्याशिवाय क्रेडिट कार्ड व्यवसाय सुरु करण्यास एनबीएफसींना परवानगी नाही. क्रेडिट कार्ड व्यवसायाबाबत येथे स्पष्ट करण्यात येते आहे की, ठेवी न स्वीकारणाऱ्या कंपनीसह, ह्या व्यवसायात येऊ पाहणाऱ्या कोणत्याही कंपनीला, तसे करण्याची नेमकी परवानगी घेणे आणि पंजीकरण प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे व त्यासाठी किमान निजनिधी रु १०० कोटी असावयास पाहिजे व ह्याबाबत ह्या बॅंकेने वेळोवेळी विहित केलेल्या अटी व शर्तींचे पालन केले असले पाहिजे. फेब्रुवारी २१, २००५ रोजीच्या पत्रकात नेमकेपणाने सांगितल्यानुसार, एनबीएफसींना, डेबिट कार्ड्स, स्मार्ट कार्ड्स, स्टोअर्ड व्हॅल्यु कार्ड्स इत्यादी देण्यास परवानगी नाही. ह्याशिवाय, रिझर्व बॅंकेने परिपत्रक डीबीओडी.एफएसडी.बीसी.४९/२४.०१.०११/२००५-०६ दि. नोव्हेंबर २१,२००५ अनुसार दिलेल्या सूचनांचे एनबीएफसींनी पालन केले जाणे आवश्यक आहे.

[सविस्तार माहिती डीएनबीएस(पीडी).सीसी.क्र.४१/१०.२७/२००४-०५ दि जुलै ७, २००४ व डीबीओडी. एफएसडी. बीसी ४९/२४.०१.०११/२००५-०६ दि नोव्हेंबर २१,२००५ मध्ये दिली आहे.]

**को-ब्रॅंडेड क्रेडिट कार्ड्स देणे**

४) भारतीय रिझर्व बॅंकेकडे पंजीकृत झालेल्या व निवडक एनबीएफसींना, रिस्क शेअरिंग न करता व रिझर्व बॅंकेची पूर्वमंजुरी घेतल्यावर, सुरुवातीच्या दोन वर्षांसाठी व त्यानंतर पुनरावलोकन केल्यानंतर, अनुसूचित वाणिज्य बॅंकांसह/सहभागाने को-ब्रॅंडेड क्रेडिट कार्ड्स देण्यासाठी परवानगी देण्याचे ठरविण्यात आले आहे. किमान पात्रता निकष व काही अटी पूर्ण करणाऱ्या एनबीएफसी अर्ज करण्यास पात्र असतील.

[अधिक माहिती, डीएनबीएस (पीडी) सीसी क्र. ८३/०३.१०.२०/२००६-०७ दि.डिसेंबर ०४, २००६ मध्ये दिली आहे.]

**एनबीएफसींद्वारा म्युच्युअल फंडांचा उत्पादांचे वितरण**

५) ह्याशिवाय, रिझर्व बॅंकेची पूर्वमंजुरी घेऊन निवडक एनबीएफसींना, म्युच्युअल फंडाचे एजंट ह्या नात्याने, म्युच्युअल फंडाच्या उत्पादांचे विपणन व वितरण करण्यास सुरुवातीची दोन वर्षे व त्यानंतर आढावा घेऊन परवानगी देण्याचे ठरविण्यात आले आहे. काही किमान पात्रतांची आवश्यकता पूर्ण करणाऱ्या एनबीएफसी अर्ज

करण्यास पात्र ठरतील. ह्या बँकेच्या नजरेस त्यातील अयोग्य/वाईट कार्यरीती आल्यास अशी परवानगी तीन महिन्यांची नोटिस देऊन काढून घेतली जाईल.

[सविस्तार माहिती डीएनबीएस (पीडी)सीसी क्र. ८४/०३.१०.२७/२००६-०७ दि डिसेंबर ०४, २००६ मध्ये दिली आहे]

**परिशिष्ट**

| अनुक्रमांक | परिपत्रक क्र. | दिनांक |
|---|---|---|
| १. | डीएनबीएस.(पीडी).सीसी. क्र. १३/०२.०१/९९-२००० | जुन ३०, २०००. |
| २. | डीएनबीएस.(पीडी).सीसी. क्र. १८/०२.०१/२००१-०२ | जानेवारी १, २००२ |
| ३. | डीएनबीएस.(पीडी).सीसी. क्र. ३५/१०.२४/२००३-०४ | फेब्रुवारी १०, २००४ |
| ४. | डीएनबीएस.(पीडी).सीसी. क्र. ४१/१०.२७/२००४-०५ | जुलै ७, २००४ |
| ५. | डीएनबीएस.(पीडी).सीसी.क्र.८३/०३.१०.२७/२००६-०७ | डिसेंबर, ०४, २००६ |
| ६. | डीएनबीएस.(पीडी).सीसी.क्र.८४/०३.१०.२७/२००६-०७ | डिसेंबर, ४, २००६ |
| ७. | डीएनबीएस.पीडी.सीसी.क्र.२२१/०३.०२.००२/२०१०-११ | मे २७, २०११ |